# राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना.

| अ.क्र. | योजना | सविस्तर माहिती |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठे व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना. |
| 2 | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय क्रमांक एफईडी 1592/1202/(1132)/साशि-5,<br>दिनांक 18 ऑक्टोबर, 1993. |
| 3 | योजनेचा प्रकार/स्वरुप | प्रति वर्षी राज्यातील सर्व भागात खरीप हंगामातील व रब्बी हंगामातील पिकांची पैसेवारी ठरविण्यात येते. त्यावेळी ज्या गावांची अंतिम पैसेवारी 50 पेक्षा कमी असते ती, गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर केली जातात. |
| 4 | योजनेचा उद्देश | राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीचा लाभ देणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | संबंधित विद्यार्थी ई.बी.सी. धारक व टंचाईग्रस्त गावातील रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. संबंधित विद्यार्थ्याचे गाव टंचाईग्रस्त म्हणून जाहिर केलेले असणे आवश्यक आहे.<br>२. संबंधित विद्यार्थी ई.बी.सी. योजनेसाठी पात्र व टंचाईग्रस्त गावातील रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>३. ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही<br>अ) ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार 100 टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.<br>आ) जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील.<br>इ) जे विद्यार्थी बहिस्थ म्हणून नोंदले असतील.<br>ई) ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी-धंदा करतात, परंतु त्यांच्या नांवे गावी शेत जमिन आहे असे विद्यार्थी. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र<br>२. सक्षम प्राधिकरणाने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र<br>३. टंचाईग्रस्त भागातील असल्याचे प्रमाणपत्र |
| 8 | दिल्या जाणा-या लाभाचे स्वरुप | परीक्षा शुल्क माफीचे लाभ |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | या योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास संबंधित महाविद्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. |